# सायबर फसवणुकीला लगाम!

## पिंपरी-चिंचवडमध्ये सहा महिन्यांत २८३ मोठ्या सायबर फसवणुकीच्या तक्रारी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र, राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टल आणि सीसीटीएनएस यांची परस्पर जोडणी अधिक सक्षम करण्यात आली आहे. पाच लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रकमेच्या सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये आता थेट 'ऑटो एफआयआर' दाखल होणार आहे. त्यामुळे गुन्हा नोंदविण्यात होणारा विलंब टळून तपासाला तातडीने सुरुवात होणार आहे.**




नवीन प्रणालीत पीडिताने '१९३०' हेल्पलाइन किंवा राष्ट्रीय सायबर गुन्हे पोर्टलवर तक्रार नोंदवताच ती डिजिटल पद्धतीने नोंदविली जाईल. पात्र प्रकरणांमध्ये प्रणालीद्वारे आपोआप 'ई-झिरो एफआयआर' तयार होऊन संबंधित पोलिस ठाण्याकडे तपासासाठी वर्ग केला जाईल. त्यामुळे संशयित बँक व्यवहार तातडीने रोखणे, डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवणे आणि तपास वेगाने सुरू करणे शक्य होणार आहे.

यापूर्वी तक्रार आणि एफआयआर नोंदविण्यात होणाऱ्या विलंबाचा फायदा सायबर गुन्हेगार घेत होते. तोपर्यंत फसवणुकीची रक्कम विविध खात्यांमध्ये वळविली जात असल्याने पैसे परत मिळविणे कठीण जात होते. नव्या प्रणालीमुळे अशा पात्र तक्रारींचे थेट एफआयआरमध्ये रूपांतर होणार असल्याने तपास अधिक प्रभावी होण्याची अपेक्षा आहे.

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत गेल्या सहा महिन्यांत पाच लाख रुपयांपेक्षा जास्त फसवणुकीच्या २८३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. नव्या प्रणालीमुळे या पात्र तक्रारींचे थेट 'ई-झिरो एफआयआर'मध्ये रूपांतर होणार आहे. शहरात वर्षाला सरासरी साडेसात हजार पारंपरिक गुन्हे, तर सायबर विभागाकडे १७ हजारांहून अधिक तक्रारी येतात. ऑनलाइन गुंतवणूक, डिजिटल अटक, यूपीआय फ्रॉड आणि केवायसी अपडेटच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. सायबर गुन्ह्यांचा तपास अत्यंत क्लिष्ट असून त्यात बँक व्यवहार, आयपी अॅड्रेस, यूपीआय ट्रेल, पेमेंट गेटवे आणि परराज्यातील यंत्रणांशी समन्वय साधावा लागतो. तपासाचे अधिकार प्रामुख्याने पोलिस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे असल्याने एफआयआरची संख्या वाढल्यानंतर तपासावरील कामाचा ताणही वाढणार आहे. त्यामुळे सायबर तपास यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

यामध्ये नागरिकांची जागरूकताही तितकीच महत्त्वाची ठरणार आहे. कोणतीही सायबर फसवणूक झाल्यास वेळ न दवडता तात्काळ '१९३०' हेल्पलाइन किंवा राष्ट्रीय सायबर गुन्हे पोर्टलवर तक्रार नोंदविल्यास आर्थिक नुकसान कमी करण्याची शक्यता वाढणार आहे. नव्या 'ई-झिरो एफआयआर' प्रणालीमुळे तक्रार नोंदविण्यापासून तपास सुरू होईपर्यंतचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी होणार असून गुन्हेगारांवर तातडीने कारवाई करणे शक्य होईल.

तसेच राज्यभर सायबर गुन्ह्यांच्या तपासात अधिक पारदर्शकता, समन्वय आणि कार्यक्षमता निर्माण होण्यास मदत होणार आहे. डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या युगात नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ही प्रणाली महत्त्वाचे पाऊल मानली जात आहे.

> सायबर फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये प्रत्येक मिनिट महत्त्वाचा असतो. फसवणूक झाल्याचे समजताच नागरिकांनी त्वरित '१९३०' हेल्पलाइनवर किंवा राष्ट्रीय सायबर गुन्हे पोर्टलवर तक्रार नोंदवावी. तक्रार जितक्या लवकर मिळेल तितकी रक्कम होल्ड करण्याची शक्यता वाढते. उशीर झाल्यास पैसे इतर खात्यांत ट्रान्सफर होतात.
>
> **– रोहिदास पवार, पोलीस उपायुक्त (गुन्हे), पिंपरी-चिंचवड.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य महारक्तदान

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने बुधवारी (दि. २२ जुलै) शहरभरात भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**




रक्ताची वाढती गरज लक्षात घेता सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या महारक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. शहरातील विविध शैक्षणिक संस्था, मंगल कार्यालये, मंदिर परिसर, समाजमंदिरे आणि सार्वजनिक सभागृहांमध्ये हे शिबिर पार पडणार आहे.

चिंचवड विधानसभा मतदारसंघात काळेवाडी, थेरगाव, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, वाल्हेकरवाडी, प्राधिकरण आणि आकुर्डी परिसरातील केंद्रांवर रक्तदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. तर भोसरी विधानसभा मतदारसंघात चिखली, कुदळवाडी, दिघी, भोसरी, मोशी, चऱ्होली, इंद्रायणीनगर, संतनगर, तळवडे आणि यमुनानगर परिसरातील विविध केंद्रांचा समावेश करण्यात आला आहे.

या उपक्रमामुळे शहरातील रक्तपेढ्यांना मोठा आधार मिळणार असून, गरजू रुग्णांसाठी रक्ताचा साठा वाढण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून जनसेवेचा संदेश देण्याचा प्रयत्न असल्याचे भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे म्हणाले, "मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची परंपरा आम्ही जपली आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी या महारक्तदान शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करावे आणि गरजूंच्या जीवनरक्षणासाठी हातभार लावावा."

शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी प्रत्येक केंद्रावर स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली असून, संपर्कासाठी स्वतंत्र दूरध्वनी क्रमांकही उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

> मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त समाजाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे महारक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळते. त्यामुळे हा केवळ वाढदिवसाचा उत्सव नसून, जनसेवेचा संकल्प आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील प्रत्येक नागरिकाने या उपक्रमात सहभागी होऊन रक्तदान करावे आणि 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' हा संदेश अधिक व्यापक करावा.
>
> **– शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.**